# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २५–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. अशोक मदगोंडा पुजारी,<br>मु. पो. बेळोंडगी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महंकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**<u>कोरम</u>** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. अशोक मदगोंडा पुजारी, मु.पो बेळोंडगी, ता. जत, जि. सांगली यांनी वीज पुरवठा मिळावा म्हणून दि. १५.१०.२००९ रोजी रु. ५०/– प्रोसेसिंग फी भरुन अर्ज दाखल केला आहे. तथापि विहित मुदतीत जोडणी न दिल्याने प्रथमत: अंतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगली त्यानंतर कक्षाचा निर्णय मान्य न झालेने दि. ११.२.२०१० रोजी मंचात तक्रार दाखल केली आहे. मंचाने तक्रार दाखल करुन घेवून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला व २३.३.२०१० रोजी सुनावणीची तारीख निश्चित केली. तथापि वि.प.यांचेकडे वीज बील थकबाकी वसुलीचे काम मार्च अंतापर्यंत चालणार असल्याने वि.प.ने मुदत वाढवून मागितली. त्याप्रमाणे वि.प.स मुदत देण्यात आली.

वि.प.च्या वतीने कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी व संबंधित अधिकारी तसेच ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित होते.

मुळ तक्रार अर्ज, मुद्देनिहाय अभिप्राय, अंतर्गत कक्षाचा निर्णय, सुनावणी दरम्यानची कथने या सर्व कागदपत्रांचा अभ्यास करतां, मंच खालील निष्कर्षाप्रत आला आहे.

ग्राहकाने आपल्या शेतामध्ये शेती वापरासाठी दि. १५.१०.२००९ रोजी रु. ५०/– भरुन मागणी नोंदविल्याचे दिसून येते. रु. ५०/– प्रोसेसिंग फी भरल्यावर ग्राहकाने करावयाच्या खर्चाचे चलन वितरण वाहिनीचा विस्तार गृहीत धरुन एक महिन्याचे आंत देणे विनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. म्हणजे असे चलन दि. १४.११.२००९ चे आंत किंवा तेथपर्यंत देणे आवश्यक होते. तशी कृती वि.प.कडून घडलेली नसल्याने व प्रत्यक्षात असे चलन दि. १८.१.२०१० रोजी दिले असल्याचे वि.प.ने नमूद केले आहे. त्याचा आधार धरुन दि. १४.११.२००९ ते दि. २८.१.२०१० या विलंबाच्या ११ आठवड्यास किंवा त्याचा भागास रु. १००/– या प्रमाणे भरपाई देणे योग्य आहे असे मंचाचे मत आहे.

तथापि सुनावणीच्या दरम्यान कनिष्ठ अभियंता व संबंधितांनी सदरची विलंब भरपाई माफ व्हावी, आम्ही ग्राहकास वीज जोडणी दिलेली आहे असे सांगितले व परत कागद हजर करण्यास मुदत मागितली त्यांस ग्राहक प्रतिनिधींनी सहमती दर्शविली. प्रत्यक्षात असे वीज कनेक्शन दिल्याचा कागद ६.४.२०१० रोजी मंचात दाखल केला. त्या कागदाचे अवलोकन करता, ग्राहकाने सदर कागदावर अंगठा उठविला आहे व मूळ तक्रार अर्जात कानडी सही केली आहे या बाबी नजरेत आल्याने व वि.प.च्या निदर्शनास आणून दिल्याने भरपाई देणेबद्दलचा निर्णय निश्चित केला व तसा आदेश मंच देत आहे.

अंतर्गत कक्ष सांगली तसेच कवठे महंकाळ विभाग यांनी मंचासमोर कागद हजर करतांना दक्षता घेणे जरुर आहे. सांगली अंतर्गत कक्षाचे नोडल ऑफीसर कोणत्याही प्रकरणात मंचासमोर हजर होत नाहीत तसेच त्यांच्यावतीने मुद्देनिहाय अभिप्राय मंचास सादर करणे आवश्यक असतांनाही सदरचे अहवाल कार्यकारी अभियंता अगर इतरांच्या सहीने दिले जातात तेही दिलेल्या वेळेत येत नसल्याने मंचाच्या कामाकाजावर त्याचा परिणाम होत आहे ही बाब वि.प.च्या व्यवस्थापनेने लक्षात घेणे जरुर आहे. तसेच मंचासमोर हजर होत असतांना तक्रारीचे अवलोकन करुन आवश्यक ती कागदपत्रे बरोबर ठेवणे हेही तितकेच महत्वाचे आहे. बऱ्याचवेळेला मंचासमोर कागदपत्रांची जुळवाजुळवी अथवा मुदत मागितली जाते, ही बाब कामकाजास विलंब होण्यास कारणीभूत आहे ही बाब गंभीर असल्याने वि.प.ने त्यात गाभीर्याने लक्ष घालावे हे मंच सूचित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) दि. दि. १४.११.२००९ ते दि. २८.१.२०१० या विलंबाच्या ११ आठवड्यांसाठी प्रति आठवडा किंवा त्याचा भागास रु. १००/– या प्रमाणे रु. ११००/– इतकी भरपाई वि.प.ने ग्राहकास अदा करावी.

२) सदर भरपाईची रक्कम विनियमातील तरतुदीनुसार दोन बिलींग सायकलमध्ये जमा करुन शिल्लक रक्कम चेकने अथवा रोखीने वि.प.ने ग्राहकास द्यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६  ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( जी. सी. लेले )
सदस्य

श्री.  बी. जी. पवार,  अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :